REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 1 | OCTOBER - 2022

# ``विनोबा भावे यांच्या कार्याचा ऐतिहासिक मागोवा``
## A Historical Trace of Vinoba Bhave`s Work

प्रा.डॉ. संजय जिभाऊ पाटील
M.A., M.Phil, Ph.D.
सहयोगी प्रध्यापक, इतिहास विभाग, क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय,
नवलनगर, ता.जि.धुळे.

**प्रास्तविक :**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याची सुत्रे महात्मा गांधीजींकडे आल्यानंतर या लढ्याला एक वेगळीच कलाटणी मिळाली होती. गांधी विचाराकडे अनेक तरूण आकर्षिले गेले होते. त्यापैकी विनायक नरहर भावे हे अग्रस्थानी दिसून येतात. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अतिशय महत्त्वपूर्ण असे योगदान दिले आहे. आपल्या घरादाराचा त्याग करून त्यांनी लढ्यामध्ये झोकून दिले होते. वर्धा आश्रमाची स्थापना, केरळ प्रांतातील वायकोम येथील सत्याग्रहाचे नेतृत्व, 1930चा वर्धा जंगल सत्याग्रह, व्यक्तीगत सत्याग्रही म्हणून त्यांची प्रथम झालेली निवड, गांधीजींच्या निर्वाणानंतरही त्यांनी केलेले कार्य यामध्ये कांचनमुक्ती चळवळ, भूदान चळवळ इत्यादींचा अल्पसा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून करण्यात आला आहे.



- **पूर्वचरित्र :-**

विनायक नरहर भावे अर्थात आचार्य विनोबा भावे यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यातील गागोदे गावी 11 सप्टेंबर, 1895 रोजी झाला. त्यांचे आजोबा उदार व धर्मपरायण होते. त्यांचे वडिल तीक्ष्ण बुध्दिमत्तेचे व महत्त्वाकांक्षी होते. विनोबांचे बालपण खेड्यातच गेले होते. त्यांच्या आईने त्यांच्यावर मौलिक संस्कार केले होते. प्राथमिक शिक्षण पुणे येथे झाल्यानंतर सन 1905 साली ते बडोदा येथे आपल्या वडिलांबरोबर गेले. त्यांचे वडील बडोदा येथे सरकारी नोकरीस होते. विनोबांना मराठी, संस्कृत, फ्रेंच इत्यादी भाषांची आवड होती. त्याचबरोबर त्यांना गणित विषयातही खुप रस होता. विनोबांनी सन 1914 मध्ये शालांत परीक्षा पास केली व त्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला. मात्र त्यांचे शिक्षणात मन रमले नाही. बंगालच्या क्रांतिकारकांनी त्यांना प्रेरित केल्यामुळे ते राष्ट्रीय चळवळीकडे आकर्षित झाले होते. एका बाजूला त्यांना असलेली अध्यात्माची ओढ आणि दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्य संग्रामाची असलेली ओढ यामुळे त्यांनी घर सोडण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी घराचा त्याग केल्यानंतर काशीला प्रयाण केले तेथे त्यांनी संस्कृत भाषेचे व धर्मग्रंथांचे सखोल अध्ययन केले. याचवेळी त्यांनी राजकीय पुढाऱ्यांशी देखील संपर्क ठेवला होता. सन 1916 मध्ये काशी येथे हिंदू विश्वविद्यालयाच्या समारंभानिमित्ताने महात्मा गांधीजींचे भाषण झाले होते. त्यामुळे विनोबा भावे गांधीजींकडे आकर्षिले गेले आणि ते कोचरब येथे गांधीजींच्या आश्रमात दाखल झाले. या आश्रमातील सरळ पवित्र जीवनक्रम आणि वागण्यात नसलेला भेदभाव, देशभक्ती आणि त्याग युक्त तपस्व्यासारखे जीवन पाहून विनोबांच्या मनावर खोलवर ठसा उमटला होता. विनोबा भावे यांनी जे उद्देश मनात धरून घर सोडले होते ते क्रांती आणि

अध्यात्म हे दोन्ही उद्देश गांधीजींच्या जीवनात त्यांना एकत्र लाभले होते.[1] त्यानंतरच्या काळात विनोबांची अतिश्रमामुळे प्रकृती बिघडल्यामुळे त्यांनी आश्रमातून एक वर्षाची सुट्टी घेतली होती. त्या काळात त्यांनी वाई येथे नारायण शास्त्री मराठे यांचे मार्गदर्शन घेऊन उपनिषदे, गीता, ब्रम्हसुत्रे, शांकरभाष्य, मनुस्मृती, पातंजल योग दर्शन, वैशेषिक दर्शन आणि याज्ञवल्ल्य स्मृती सारख्या नानाविध ग्रंथांचा अभ्यास केला. हे करीत असतांना त्यांनी आश्रमातील व्रत वैकल्यांचे कटाक्षाने पालन केले होते. हे पाहून खुद्द गाधींजी देखील भारावून गेले होते. त्यानंतर काही दिवस विनोबांनी गुजरात विद्यापीठात अध्यापनाचे कार्य केले होते.[2]

- **वर्धा आश्रमाची स्थापना :-**

सन 1921 साली महात्मा गांधीजींनी वर्धा येथे आश्रम स्थापन करण्याची विनंती विनोबा भावे यांना केली होती. म्हणून विनोबा भावे सन 1921 मध्ये वर्धा येथे गेले होते. त्या ठिकाणी त्यांनी आश्रमाची स्थापना केली. हा आश्रम अहिंसाव्रती समर्पित कार्यकर्ते निर्माण करणारा होता.[3] वर्धा भागातील रचनात्म कार्याचा केंद्रबिंदू म्हणून वर्धा आश्रम सुप्रसिध्द असल्याचे लक्षात येते.

- **केरळ प्रांतातील वायकोम येथील सत्याग्रहाचे नेतृत्व :-**

सन 1923 साली गांधीजींच्या आदेशान्वये नागपूर येथे झेंडा सत्याग्रह करण्यात आला होता. या सत्याग्रहात विनोबा भावे यांनी सक्रीय सहभाग नोंदविला होता. त्यासाठी त्यांना ब्रिटीश सरकारने तुरूंगवासाची शिक्षा ठोठावली होती. सन 1924 साली विनोबा शिक्षा भोगून तुरूंगातून सुटले आणि याच वर्षी गांधीजींच्या आज्ञेनुसार विनोबाजींनी केरळ प्रांतातील वायकोम येथील सत्याग्रहाचे नेतृत्व केले होते. कारण येथील हरिजनांना देवळात तर सोडाच परंतु देवळाजवळून देखील जाण्यास मनाई करण्यात आली होती. तेव्हा तेथील सनातन लोकांचे हृदय पालट करण्याचे त्यांनी ठरवले व ते त्यात यशस्वी झाले. त्याचबरोबर 1930 साली वर्धा परिसरात झालेल्या जंगल सत्याग्रहामध्ये देखील विनोबांनी सक्रीय सहभाग घेतला होता. सन 1932 मध्ये गांधीजींनी पुकारलेल्या लढ्यामध्ये विनोबाजींनी ठिकठिकाणच्या सभांमध्ये सरकार विरोधात भाषणे दिली होती. त्यामुळे त्यांना ब्रिटीश सरकारने धुळे येथील तुरूंगात ठेवले होते. धुळे येथील कैदेत असताना विनोबा भावे यांनी गीतेच्या अठरा अध्यायांवर अठरा प्रवचने दिली होती. ही प्रवचने अतिशय अभ्यासपूर्ण व प्रभावी ठरली होती. धुळे येथे कैदेत असतांनाच विनोबा भावे यांनी `गीताई` नावाने भगवद्गीतेचे समश्लोषी भाषांतर केले.[4] गीताई व गीतप्रवचने ही विनोबा भावे यांनी मराठी सारस्वतांना दिलेली अमूल्य भेट मानली जाते.

- **वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही :-**

विनोबा भावे तुरूंगात असतांना देखील स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी ग्रामसंघटनेच्या कार्याचा संकल्प सोडला होता. तुरूंगातून सुटका होताच त्यांनी या संकल्पाच्या सिध्दीसाठी अहोरात्र प्रयत्न केले होते. खेड्यापाड्यांमध्ये पायपीट करून खेड्यापाड्यातील जनतेला सफाई, सुतकताईचे धडे दिलेत. त्यामुळेच ग्रामोद्योग संघ उभा राहिला होता. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात भारतीय जनतेने महायुध्दात कोणत्याही प्रकारची मदत ब्रिटीश सरकारला करू नये असे गांधीजींनी जाहीर केले होते. त्यासाठी त्यांनी व्यक्तिगत सत्याग्रह सुरू केला होता. या व्यक्तिगत सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही म्हणून गांधीजींनी विनोबांची निवड केली होती. व्यक्तिगत सत्याग्रहात सहभाग घेतल्यामुळे ब्रिटीश सरकारने विनोबाजींना कैदेत टाकले तरी त्यांनी आपला व्यक्तिगत सत्याग्रह चालूच ठेवला होता. म्हणून त्यांना तीन वेळा कैदेची शिक्षा देण्यात आली होती. महात्मा गांधीजींनी 1942 साली चलेजाव आंदोलन पुकारले होते. या आंदोलनात देखील विनोबाजींनी सक्रीय सहभाग घेतला होता. त्यामुळे ब्रिटीश सरकारने विनोबांवर खटला दाखल केला व त्यांना तुरूंगात टाकले होते. एवढेच नव्हे तर त्यांचे आश्रम देखील जप्त केले होते. या काळात त्यांना बेलोर येथील तुरूंगात ठेवण्यात आले. बेलोर येथील तुरूंगात असतांना त्यांनी तेलगू, कानडी, तमीळ, मल्याळम यासारख्या दाक्षिणात्य भाषा आत्मसात केल्या होत्या. ``लोकांच्या अंत:करणात सुलभ प्रवेश मिळविण्याचा सर्वात सुलभ मार्ग म्हणजे त्यांच्याशी त्यांच्या भाषेत बोलणे`` असा त्यांचा दृष्टिकोण होता.[5] भारतातल्या जवळपास सर्व भाषा विनोबाजींना अवगत होत्या.

- **सर्वोदय समाज संघाची स्थापना :-**

महात्मा गांधी यांचा 30 जानेवारी 1948 रोजी नथ्थुराम गोडसे नावाच्या माथेफिरूने गोळ्या झाडून खून केला. सर्व देश शोकसागरात बुडाला होता. त्यानंतर काही काळानंतर गांधीजींच्या अनुयायांचे एक सम्मेलन सेवाग्राम येथे भरले होते. या

सम्मेलनात सर्वोदय समाज आणि सर्व सेवा संघ यांची स्थापना करण्यात आली होती. यामागे गांधीजींचे अपूर्ण राहिलेले कार्य पुर्णत्वास नेणे हा उद्देश होता. जेथे शिस्त आहे आणि ती न पाळण्याचा विरूध्द काही उपाययोजना या कराव्याच लागतात. विनोबांच्या शब्दात ``सर्वोदय समाज ही एक अ-संघटना वा सहज-संघटना आहे.``[6] म्हणून त्याला संघ न म्हणता `समाज` असे म्हणण्यात येते. संघ शब्दात विशिष्ट अर्थ येतो. त्यात व्यापकता मात्र कमी प्रमाणात दिसते आणि `सर्वोदय` शब्दामुळे त्याची व्यापकता परिपूर्ण होते असे मत विनोबाजींचे या संदर्भात होते. विनोबांनी गांधीजींची अपूर्ण कार्ये पूर्ण करण्यासाठी हाती घेतली होती. त्यामध्ये प्रामुख्याने हिंदु-मुस्लीम शांततेचे कार्य, निर्वासितांचा प्रश्न, `मेओ` विस्थापितांची व्यवस्था यांना अग्रक्रम देण्यात आला होता. त्यात काही दिवस व्यस्त राहिल्यानंतर विनोबा भावे पुन्हा परंधाम आश्रमात परत आले होते. त्यांना जाणवले की शरीरश्रमांना प्रतिष्ठा प्राप्त होणे व लोक स्वावलंबी होणे या सर्वोदय व्यवस्थेसाठी प्रथम आवश्यक बाबी आहेत. त्या बाबी स्वत: आधी आचरणात आणण्याच्या हेतूने त्यांनी या आश्रमात कांचन मुक्तीचा प्रयोग करण्याचे ठरविले होते.

- **कांचन मुक्ती योग :-**

भारतीय समाज व्यवस्थेत स्वत: कष्ट न करता पैशांच्या बळावर इतरांचे श्रम माणूस विकत घेऊ लागला. त्यामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. समाजात विषमता अस्तित्वात येऊन ती वाढीस लागली. समाजात पैशावर प्रतिष्ठा ठरू लागली होती. त्यायोगे धनसंचयाची प्रवृत्ती वाढीस लागली. समाजनिष्ठ मुठभर अनुत्पादक वर्गाच्या हातात पैशांमुळे जमीन आणि उत्पादनाची साधने केंद्रित झाली. म्हणून उत्पादक श्रमाची प्रतिष्ठा नष्ट झाली. समाजामध्ये जोपर्यंत श्रमाला अथवा कष्टाला सन्मानाची जागा प्राप्त होत नाही तोपर्यंत समाजातील गरीब-श्रीमंत ही विषमता नाहीशी होऊ शकत नाही. सर्वांचे कल्याण साध्य होऊ शकत नाही. म्हणूनच विनोबा भावे यांनी असे मत मांडले आहे की, `सध्याच्या विकारग्रस्त समाज व्यवस्थेत प्रत्येक वस्तूचे मूल्य पैशाने ठरत असते. त्यामुळे वस्तूची खरी किंमत नजरेस पडत नाही.` पैशाला मुळीच किंमत न देता श्रमांना महत्त्व देणे यालाच विनोबाजींनी कांचन मुक्ती योग असे नाव दिले आहे.[7]

- **भूदानयज्ञ / भूदानचळवळ :-**

दक्षिण भारतातील तेलंगाणा भागात सन 1951 च्या सुमारास जमिनीचा प्रश्न अतिभयंकर स्वरूपात दिसून येत होता. कारण या काळात येथील साम्यवाद्यांनी जमीनदारांविरूध्द अनेक ठिकाणी बंड पुकारले होते. अनेक जमीनदारांचे मुडदे पाडून त्यांच्या जमिनी गरिबांमध्ये वाटून दिल्या जात होत्या. याचवेळी हैद्राबाद जवळील शिवरामपल्ली गावात सर्वोदय समाजाचे तिसरे वार्षिक अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या काळात विनोबाजींनी या भागातील परिस्थितीचे अवलोकन केले. येथील परिस्थिती त्यांनी चांगल्या प्रकारे समजावून घेतली व या संपूर्ण भागात पदयात्रा करण्याचा निर्णय घेतला. विनोबांनी पदयात्रा करत 18 एप्रिल 1951 रोजी नलगुंडा जिल्ह्यातल्या पोचमपल्ली गावात पोहोचले. पुढे दंडकारण्य सुरू होणार होते. या भागात साम्यवाद्यांचा अधिक जोर होता. येथे प्रचंड रक्तपात झालेला होता. तीन हजार वस्तीच्या गावात दोन हजार भूमिहीन हरिजनांची वस्ती होती. त्यांची स्थिती अतिशय शोचनिय झाली होती. तेव्हा या भागातील हरिजन वर्गाने विनोबाजींना 80 एकर जमीन मिळवून देण्याची विनंती केली होती. येथील सभेमध्ये विनोबाजींनी जमीन देण्याचे आवाहन केले होते. त्यावेळी रामचंद्र रेड्डी नावाच्या गृहस्थाने शंभर एकर जमीन देण्याचे मान्य केले. एकंदरित विनाबांच्या प्रबोधनाचा प्रभाव तेथील लोकांवर पडला होता. त्यामुळे विनोबाजींनी विचार केला की, `अशा तऱ्हेने पायी यात्रा करीत जमीन मिळवत गेलो तर जमिनीचा प्रश्न सुटू शकतो.` या जमिनी मिळविण्याच्या कार्याला त्यांनी `भूदान यज्ञ` असे नाव दिले आहे. अशाप्रकारे विनोबाजींच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने भूदान चळवळीचा उदय झाल्याचे दिसून येते. त्यांनी हिंसेने पीडलेल्या, रक्ताने माखलेल्या तेलंगणात घरोघरी फिरून भूदान यज्ञाचा संदेश त्यांनी दिला.[8] अवघ्या दोन महिन्यांत त्यांनी बारा हजार एकर जमीन मिळवली होती. सन 1952 मध्ये भूदान चळवळीला सर्व सेवा संघाने देखील सक्रीय पाठिंबा दिल्यामुळे हे आंदोलन तेलंगणापुरते मर्यादित न राहता ते अखिल भारतीय स्तरावर पोहोचले होते. तेलंगणा नंतर या चळवळीचे लोण बिहारमध्येही पोहोचले होते. 14 सप्टेंबर 1952 रोजी स्वत: विनोबाजी बिहार मध्ये गेले. बिहारमध्ये एका बाजूला लाखो एकर जमिनीचे मालक असलेले जमीनदार आणि दुसऱ्या बाजुला असंख्य गरीब शेतमजुरांचा वर्ग अशी परिस्थिती होती. तेव्हा बिहार राज्याला आपली प्रयोगभूमी करण्याचा निर्णय विनोबाजींनी घेतला होता. तशातच एप्रिल 1954 मध्ये बोधगया येथे सर्वोदय समाजाचे सहावे सम्मेलन भरले होते. तोपर्यंत या भागात जवळपास अठ्ठाविस लाख एकर जमीन भूदान चळवळीला मिळाली होती.[9] याच सम्मेलनात जयप्रकाश नारायण यांनी भूदान

आंदोलनासाठी स्वत:चे जीवनदान देण्याचे घोषित केले होते. सन 1957 मध्ये भूदान चळवळीचा दुसरा टप्पा सुरू झाला होता. या टप्प्यात मिळालेल्या जमिनीच्या वितरणावर भर देण्यात आला. परंतु त्यात या चळवळीला अपेक्षित यश न आल्यामुळे शेवटी ही चळवळ अपयशी ठरल्याचे लक्षात येते.

- **देहावसान** :-

भूदान चळवळीला एकोणपन्नास लाख एकर जमीन मिळाली होती. परंतु वितरण कोणी करावे, कोणाला करावे, कसे करावे या संदर्भात एकवाक्यता होऊ शकली नाही. विनोबाजींचा भर फक्त विचारांच्या प्रसारावर होता. त्यांचे कार्यकर्ते संख्येने कमी असल्याने तसेच ते या कार्या संदर्भात अनभिज्ञ होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या चळवळीला सरकारची म्हणावी तशी मदतच न मिळाल्याने शेवटी अपयश आले.[10] विनोबाजींनी ही प्रायोप्रवेश करून 15 नोव्हेंबर 1982 रोजी जगाचा निरोप घेतला.

- **समारोप :-**

महात्मा गांधीजींच्या विचारांनी प्रभावित झालेल्या विनोबा भावे यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अतिशय महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसून येते. आपल्या कार्यासाठी त्यांनी आपल्या घरादाराचा त्याग केला होता. भारतात नानाविध बोलल्या जाणाऱ्या भाषा त्यांनी आत्मसात केल्या. गांधीजींच्या आश्रमात राहून कार्य केले. वर्धा येथील आश्रमात त्यांनी रचनात्मक कार्याचा अवलंब केला. केरळ प्रांतातील वायकोम येथील सत्याग्रहाचे नेतृत्व केले व त्यात यशस्वी झाले. 1930 साली वर्धा येथील जंगल सत्याग्रहात सहभाग नोंदविला. ब्रिटीश सरकार विरोधात जनमत उभे करण्यासाठी व गांधीजींच्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्यासाठी भारतात ठिकठिकाणी सभा आयोजित करून भाषणे दिली. त्यामुळे त्यांना अनेकदा तुरूंगवास देखील पत्करावा लागला. तुरूंगात देखील विनोबाजी स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी अनेक भाषा आत्मसात केल्या. अनेक धार्मिक ग्रंथांचा अभ्यास करून प्रवचने दिली. गीताई व गीताप्रवचने आजही त्यांची साक्ष देतात. गांधीजींनी व्यक्तिगत सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली होती. यावरून त्यांच्या कार्याची महती लक्षात येते. गांधीजींचे निर्वाण झाल्यानंतर देखील विनोबाजींनी आपले कार्य चालु ठेवले होते. काचनमुक्ती व भूदान चळवळ सुरू करून भारतातील असंख्य गोरगरीब हरिजन वर्गाला त्यांनी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला होता. एकंदरित विनोबाजींचे कार्य हे स्वातंत्र्य चळवळीसाठी व भारतीय सामाजिक समतेसाठी अतिशय महत्त्वपूर्ण ठरले आहे यात शंका नाही.

- **संदर्भ :-**


१. भंडारी चारूदत्त, **भूदानयज्ञसमग्र दर्शन,** परंधाम विद्यापीठ वर्धा, प्रथम आवृत्ती, 1956, पृ.15

२. भा. ल. भोळे, **आधुनिक भारतातील राजकीय विचार,** पिंपळापुरे प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती, 1992, पृ.490

३. भावे विनायक नरहर, **सर्वोदय विचार,** ग्रामसेवा मंडळ, प्रथम आवृत्ती, 1950 वर्धा, पृ.58-62

४. राजा मंगळवेढेकर, **सानेगुरूजींची जिवन गाथा,** साधवा प्राकशन पुणे, द्वितीय आवृत्ती, 1992, पृ.181-182

५. भा. ल. भोळे, **आधुनिक भारतातील राजकीय विचार,** पिंपळापुरे प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती, 2003, पृ.491

६. विनोबा, **सर्वोदय विचार आणि स्वराज्य-शास्त्र,** परंधाम विद्यापीठ वर्धा, प्रथम आवृत्ती, 1956, वर्धा पृ.30

७. भावे विनोबा, **भूदान ते ग्रामदान,** सर्वोदय क्रांती, भारतीय विद्याभवन, मुंबई, प्रथम आवृत्ती, 1964, पृ.64

८. भंडारी, **उपरोक्त,** पृ.33

९. Bhave Vinoba, **Bhoodan to Gramdan** : Tanjavar 1956 Revolutionary Sarvodaya, Bhartiy Vidya Bhavan Bombay, 1964, P.65

१०. राजा मंगळवेढेकर, **उपरोक्त,** पृ.493, नारायण जयप्रकाश, क्रांतिका आधुनिक प्रयोग, जनता प्रकाशन पटणा, प्रथम आवृत्ती, 1954 (इतरत्र माहिती)